वर्ष- ११ | अंक- ५१ | मुंबई, मंगळवार, ४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२५ | पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No. PLG/205/2025- 2027
मूल्य २/- रुपये

पोलीस बातमी पत्र
POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

3 → मोठे व्हा, पण आमच्यापेक्षा नको

केलेल्या कामामध्ये बेजबाबदारपणा महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता व शिपाई ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

भुमिपुत्रांना नोकरी न मिळाल्यास धावपट्टी खोदू

नवी मुंबई,

लंडनमधील हीथ्रो विमानतळाशी तुलना होणाऱ्या नवी मुंबई विमानतळाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 8 ऑक्टोबर रोजी केले. यानंतर आता या विमानतळावरून प्रवासी आणि कार्गो विमानांचे टेक ऑफ डिसेंबरमध्ये होईल, अशी माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली आहे. अशातच आता नवी मुंबई विमानतळावर भुमिपुत्रांना नोकरी मिळणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यासंदर्भात मनसे नेते गजानन काळे यांनी माहिती अधिकारातून माहिती मागवली असून भुमिपुत्रांना नोकरी न मिळाल्यास विमानतळाची धावपट्टी खोदण्याचा इशारा दिला आहे.

पत्रकार परिषदेत बोलताना गजानन काळे म्हणाले की, काही दिवसांपूर्वीच नवी मुंबई विमानतळाचं अत्यंत वाजतगाजत उद्घाटन झालं. माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीनुसार, टर्मिनल वनमध्ये 25 हजार तरुणांची नोकर भरती होणार आहे. अशा चार टर्मिनलमध्ये एक लाख



रोजगार निर्मिती होणार आहे. माहितीच्या अधिकारात नवी मुंबई विमानतळावरील नोकरीसंदर्भात माहिती घेतली असता, सिडकोने त्या ठिकाणी अत्यंत धक्कादायक माहिती दिली आहे. मराठी आणि स्थानिक मुलांच्या रोजगारासंदर्भात सिडकोचं कोणतंही धोरण नाही. आतापर्यंत किती मराठी मुलांना त्यांनी रोजगार दिला, याची कुठलीही माहिती नाही, असा आरोप काळे यांनी केला.

गजानन काळे म्हणाले की, महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार, 80 टक्के तरुणांची भरती बाधित गावातून होणे गरजेचे आहे. त्यामुळे विमानतळावर नवी मुंबईतील तरुणांना आणि मराठी मुलांनाच नोकरी मिळाली पाहिजे, हा आमचा आग्रह आहे. जर असे झाले नाही तर धावपट्टी खोदण्याची तयारी मनसेची आहे. मग तुमचं विमान कशापद्धतीने उडेल हेच आम्ही बघतो, असा इशारा काळे यांनी दिला.

गजानन काळे म्हणाले की, आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार 7 ते 8 लाख रुपये रेट हाऊसकिपींगमध्ये कामाला लावण्यासाठी सुरू आहे. हाच गोंधळ अनेक संस्थांनी वाशी आणि नवी मुंबईमध्ये करून ठेवला आहे. मुलांकडून पैसे घेतले जातात, कोर्स पूर्ण होतो, मात्र मुलांना रोजगार मिळत नाही. त्यामुळे पुढच्या काही दिवसात भुमिपुत्रांच्या नोकरीसंदर्भात रोजगार विभाग, सिडको आणि विमानतळ प्राधिकरणाकडे पत्रव्यवहार करूनही जर दुरुस्ती झाली नाही, तर मनसे आणि सर्व विरोधी घटक पक्षांचा एकत्र मोर्चा विमानतळावर निघेल, असा इशाराही काळे यांनी दिले.

पैसे कोण घेतंय? असा प्रश्न विचारला असता, गजानन काळे म्हणाले की, पैसे कोण घेतंय याचे खुलासे पुढच्या काही दिवसात आम्ही करणार आहोत. तसेच त्यात विमानतळ प्राधिकरणाचे आणि सिडकोचे किती अधिकारी गुंतलेले आहे, याचा खुलासा पुढच्या काही दिवसात नक्की होईल, असेही गजानन काळे यांनी स्पष्ट केले.

वसई-विरार महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकामांवर मोठी कारवाई



विरार,

वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत आयुक्त मनोजकुमार सुर्यवंशी यांच्या निदेर्शानुसार शहरातील अनधिकृत आणि अतिधोकादायक बांधकामांवर कारवाईची विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या अनुषंगाने ३० ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध प्रभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली असून एकूण ६७ हजार ७१० चौ. फुट अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले आहे. प्रभाग बी मध्ये तुळींज पोलीस स्टेशन ते यशवंत हाइट परिसरात व नीलकंठ अपार्टमेंट, मोरेगाव तलावाशेजारील बांधकामांवर कारवाई करून ३ हजार ६०० चौ. फुट बांधकाम हटविण्यात आले आहे.

प्रभाग सी मधील रशीद कंपाऊंड, गोकुळवाडा, वनोठा पाडा व जिवदानी कृपा चाळ (जी+1) येथील १७ हजार ४०० चौ. फुट बांधकाम निष्कासित केले. तर प्रभाग ई मध्ये नालासोपारा (पू.) परिसरातील महेश्वरी अपार्टमेंट (जी +4), गणपती गल्ली व रेल्वे स्टेशन परिसरातील १० हजार २६० चौ. फुट बांधकाम तोडण्यात आले. प्रभाग एफ मध्ये रिचर्ड कंपाऊंड व अवदूत आश्रम समोर, सोपारा फाटा येथे ४,९०० चौ. फुट बांधकामावर कारवाई झाली. प्रभाग जी मध्ये चिंचोटी, बापाणे ब्रिज ते मालजीपाडा, जुचंद्र व आर्यन आग्री कट्टा हायवे परिसरातील २० हजार ६०० चौ. फुट बांधकाम निष्कासित करण्यात आले. प्रभाग आय मध्ये रमेदी चर्च परिसरात १ हजार ५० चौ. फुट अतिधोकादायक बांधकाम हटविण्यात आले. तर विशेष नियोजन प्राधिकरण विभागात मौजे टोकरे व मौजे खैरपाडा येथील ९ हजार ९०० चौ. फुट बांधकाम काढण्यात आले आहे. या सर्व कारवाया महानगर आयुक्त, अतिरिक्त आयुक्त उत्तर-दक्षिण तसेच उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. महानगरपालिकेने सांगितले की, शहरातील अनधिकृत बांधकामांवर नियमितपणे अशाच प्रकारे कठोर कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी नियमबाह्य बांधकाम टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पूरग्रस्त 12वीच्या विद्यार्थ्यांना फॉर्म भरण्यासाठी मुदतवाढ, फी माफीचाही निर्णय घेणार का?



मुंबई,

संपूर्ण मराठवाडा, सोलापूर, बुलढाणा, जळगाव, नाशिक जिल्ह्याला पावसाचा जोरदार तडाखा बसला आहे. शेतकरी उद्धध्वस्त झाला आहे, सामान्य लोकांचे संसार उघड्यावर आले आहेत. होतं नव्हतं ते सारं वाहून गेले आहे. बहुतेक जनता नेसत्या कपड्यावर आहे. अशी अवस्था असताना विद्यार्थ्यांना बारावीच्या परीक्षेचा फॉर्म भरण्याचं टेन्शन आहे. नुकताच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा 2025 पुढे ढकलण्यात आली आहे. या पार्श्वभूमिवर बारावी परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ मिळावी, अशीही मागणी होत आहे. या मागणीचा शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सकारात्मक विचार केला आहे.


मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशिव, बीड आदी जिल्ह्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. सीना नदीला आलेल्या पुरामुळे अनेक कुटुंब उघड्यावर पडली आहेत. घरदार उघड्यावर पडल्याने बारावीच्या परीक्षेचा फॉर्म कसा भरावा, याचे टेन्शन पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना आहे. यायबाबत शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी पूरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना बारावी परीक्षेचा फॉर्म भरण्यासाठी मुदतवाढ करण्याची सूचना केली आहे. ही मुदतवाढ 15 दिवसांची असेल. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचनेनंतर शिक्षणमंत्र्यांनी हा निर्णय घेतला आहे.

विशेष म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा 2025 ही रविवारी 28 सप्टेंबर घेण्यात येणार होती. पण मराठवाड्याला अतिवृष्टीचा तडाखा बसल्यानंतर ही परीक्षा पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी एमपीएससीच्या विद्यार्थ्यांसोबतच विरोधकांकडून करण्यात आली होती. त्यानुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने याबाबतचा निर्णय घेत ही परीक्षा रविवार, 9 नोव्हेंबर 2025 रोजी घेण्याचे जाहीर केले आहे. राज्यातील 37 जिल्हा केंद्रांवरील 524 उपकेंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येणार होती. अतिवृष्टीचा फटका बसलेल्या जिल्ह्यातील एमपीएससी उमेदवार या परीक्षेपासून वंचित राहू नये, यासाठी आज अखेरीस ही परीक्षा पुढे ढकलण्याची सूचना करण्यात आली आहे.

असाच निर्णय आता बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षणमंत्र्यांनी घेतला आहे. शिक्षण मंत्र्यांनी लगेचच राज्य परीक्षा मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांच्याशी संपर्क साधून अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार शिक्षण विभागामार्फत 20 ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्यासाठी मुदतवाढीचा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात शिक्षण विभागामार्फत परिपत्रक जारी करण्याची प्रक्रिया करण्यात आली.

सरकारच्या अर्ज भरण्याच्या मुदतीवाढीचे विद्यार्थ्यांनी स्वागत केले आहे. मात्र, ग्रामीण भागाचे अमाप नुकसान झाल्याने या विद्यार्थ्यांची फी माफ करणार का, असा सवाल आता केला जात आहे. शेतकरी, सर्वसामान्यांचे शेत, घर धुवून निघाले आहे. घरात खायला अन्नधान्य नाही, अशी अवस्था त्यांची झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची फी माफ केली तर कुटुंबाला मोठा आधार मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शिक्षणमंत्री फी या विद्यार्थ्यांच्या फी माफीचा निर्णय घेणार का? याची आस विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना लागून राहिली आहे.

नवी मुंबईत शौचाचल, रस्त्यावर अन् आयुक्तांच्या बंगल्यात १५० मतदारांची नोंद



नवी मुंबई,

मतदार याद्यांमधील घोळ आणि दुबार नावांच्याविरोधात महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली आहे. येत्या 1 नोव्हेंबर रोजी मुंबईत राज्य निवडणूक आयोगाविरोधात मोर्चा काढला जाणार आहे. त्यासाठीची तयारी सर्व विरोधी पक्षांकडून सुरु आहे. त्यातच नवी मुंबईमध्ये मतदार याद्यांमधील धक्कादायक माहिती समोर आली आहे. चक्क नवी मुंबई महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या शासकीय निवासस्थानी तब्बल 150 मतदारांच्या नावांची नोंद सापडली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते गजानन काळे यांनी ही बाब उघड केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दावा केला आहे की, संपूर्ण राज्यात जवळपास 96 लाख बोगस मतदार आहेत. नवी मुंबईत पामबीच रोड, शौचालय आणि नेरुळ रेल्वे स्थानकासमोर अशा पत्त्यांवर मतदारांची नोंद सापडली आहे. यामुळे निवडणूक आयोगाच्या कारभारावर मनसेने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. नवी मुंबई महापालिका आयुक्तांचे निवासस्थान नेरूळ रेल्वे स्थानका समोर असून या पत्त्यावर तब्बल 150 मतदारांची नोंद करण्यात आली आहे. मतदार यांद्या मधील 150 मतदारांचा पत्ता हा नेरूळ रेल्वे स्टेशन, मनपा आयुक्त निवास असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे चक्क महापालिका आयुक्तांच्या निवासस्थान असलेल्या पत्त्यावर मतदारांची नोंद झाल्याने परत एकदा निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या आधी महापालिका सार्वजनिक शौचालयात मतदारांची नोंद आढळली आहे. त्यानतंर पामबीच रोडवर 250 मतदारांची नोंद झाली असून आता महापालिका आयुक्तांच्या निवासी पत्त्यावर 150 मतदारांची नोंद सापडली आहे, असे मनसे नेते गजानन काळे यांनी सांगितले.


मतदार याद्यांमधील घोळाबद्दल महाविकास आघाडी आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार या नेत्यांनी 15 आणि 16 ऑक्टोबर रोजी राज्य निवडणूक आयोगाची भेट घेतली होती. या भेटीत त्यांनी मतदार याद्यांमध्ये असलेला घोळ दुरुस्त केल्याशिवाय स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका घेऊ नका असे आवाहन आयोगाला केले. आता या विरोधात येत्या 1 नोव्हेंबरला सत्याचा मोर्चा मुंबईत निघणार आहे.

दिवाळीचा गृहपाठ न केल्याने ८वीच्या विद्यार्थिनीला शिक्षिकेकडून मारहाण

मुंबई,

दिवाळीच्या सुट्टीसाठी दिलेला गृहपाठ पूर्ण न केल्यामुळे घाटकोपरमधील एका खासगी शिकवणीच्या शिक्षिकेने १३ वर्षीय विद्यार्थिनीला मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. हा प्रकार २५ ऑक्टोबर रोजी घाटकोपर (पश्चिम) येथील गुरुनानक नगर परिसरातील खासगी शिकवणी 'खडका क्लासेस'मध्ये घडला.

लक्ष्मी दीपक खडका असे आरोपी शिक्षिकेचे नाव असून त्यांनी इयत्ता आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीला वर्गात लाकडी छडीने मारहाण केली, ज्यामुळे तिच्या हातावर जखमा झाल्या, असे मिड-डेने पोलिसांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे. घरी परतल्यावर मुलीच्या हातावर लाल डाग वडिलांनी बघितले. त्यांनी चौकशी केली असता



मुलीने घडला प्रकार सांगितला. या घटनेमुळे संतप्त झालेल्या वडिलांनी घाटकोपर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

शिक्षिकेला नोटीस, लवकरच चौकशीसाठी बोलावणार


तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी शिक्षिकेविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इठर) कलम ११८(१) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. हे कलम धोकादायक शस्त्रास्त्र किंवा साधनांच्या साहाय्याने एखाद्याला दुखापत केल्यास लागू होते. तसेच बालकांच्या काळजी व संरक्षण कायदा, २०१५ च्या कलम ७५ अंतर्गतही कारवाई करण्यात आली आहे, ज्यामध्ये मुलांच्या काळजी वा देखरेखीची जबाबदारी असणाऱ्या व्यक्तीने क्रूरता केल्यास शिक्षा होते.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांनी सांगितले की, ''शिक्षिकेला कायदेशीर प्रक्रियेअंतर्गत नोटीस देण्यात आली असून तिला चौकशीसाठी लवकरच बोलावले जाणार आहे. पीडित मुलीचा जबाब नोंदवला असून वर्गात उपस्थित इतर विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचेही जबाब घेतले जात आहेत,'' असे त्यांनी सांगितले. प्राथमिक चौकशीत मुलीला लाकडी छडीने हातावर दोन वेळा मारण्यात आले असून त्यामुळे हातावर खोल निशाण आणि जखम झाल्याचे समोर आले आहे.

ताम्हिणी घाट परिसरात दगड डोक्यात आदळल्याने महिलेचा मृत्यू

रायगड,

ताम्हिणी घाट परिसरात सुरू असलेल्या मुसळधार परतीच्या पावसामुळे अनेक ठिकाणी दरड आणि दगड कोसळण्याच्या घटना घडत आहेत. याच पार्श्वभूमीवर आज सकाळी ताम्हिणी घाटात एक हृदयद्रावक अपघात घडला. पुण्याहून माणगावकडे जात असलेल्या एका कारवर डोंगरावरून पडलेला दगड थेट कारच्या सनरूफमधून आत घुसल्याने कारमधील महिलेचा जागीच मृत्यू झाला.




मृत महिलेचे नाव स्नेहल गुजराती (वय ४२) असे असून, त्या आपल्या कुटुंबासह प्रवास करत होत्या. मिळालेल्या माहितीनुसार, घाटात त्या वेळेस जोरदार पाऊस सुरू होता. अचानक डोंगरकड्यावरून काही दगड खाली पडले. काही दगड कारच्या टपावर आदळले, मात्र एका मोठ्या दगडाने थेट सनरूफची काच फोडून आत प्रवेश केला. हा दगड थेट स्नेहल यांच्या डोक्यात आदळला. त्यांच्या डोक्याला जबर मार लागला. या गंभीर जखमेमुळे त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर कारमधील त्यांचे पती आणि मुलगा किरकोळ जखमी झाले असून त्यांना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. परंतु, रुग्णालयात पोहचण्यापूर्वीच स्नेहल यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

या घटनेनंतर रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाने तात्काळ त्या भागातील रस्त्यांची पाहणी व सुरक्षा उपाययोजनांचे आदेश दिले आहेत. ताम्हिणी घाट परिसरात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे डोंगरकड्यांवर साचलेली माती आणि सैल दगड घसरत आहेत. यामुळे प्रशासनाने नागरिकांना 'अत्यावश्यक कारणाशिवाय घाटमार्गावरून प्रवास करू नये' असे आवाहन केले आहे.

हायकोर्टच्या व्हर्च्युअल सुनावणीआधी वकिलाचा तोल सुटला, तिला जवळ ओढलं आणि..



नवी दिल्ली,

व्हर्च्युअल सुनावणीशी संबंधित एक व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरलाय. फेसबुक, ट्वीटर, इन्स्टाग्राम अशा प्लॅटफॉर्मवर तो प्रचंड चर्चेत आहे. हा व्हिडिओ कोणत्याही कायदेशीर युक्तिवादाशी संबंधित नाहीय. तर ऑनलाइन सत्र सुरू होण्यापूर्वी एका वकीलाच्या अयोग्य वैयक्तिक वर्तनामुळे या व्हिडीओची जास्त चर्चा होतेय. काय घडलाय नेमका प्रकार?

ही घटना मंगळवारी १४ ऑक्टोबर २०२५ रोजी घडल्याचे सांगितले जाते, जेव्हा न्यायालयाचे सत्र सुरू झाले नव्हते आणि सर्वजण न्यायमूर्तींच्या आगमनाची प्रतीक्षा करत होते. दिल्ली उच्च न्यायालयाच्या एका सुनावणीआधीचा हा व्हिडीओ असल्याचं म्हटलं जातंय.

व्हिडिओमध्ये वकील आपल्या खोलीत कायद्याच्या पोशाखात बसलेला दिसतो, कॅमेरापासून काहीसा बाजूला, ज्यामुळे त्याच्या चेहऱ्याचा फक्त एक भाग दिसतो. त्याच्या समोर साडी नेसलेली एक महिला उभी आहे. वकील तिचा हात ओढून तिला जवळ खेचतो.

महिलेला संकोच वाटत असल्याचे आणि ती प्रतिकार करत असल्याचे दिसते, तरीही वकील तिला गालावर चुंबन देतो, आणि नंतर ती मागे सरकते.हा व्हिडिओ अवघ्या दोन तासांत 89.7 हजारांहून अधिक वेळा पाहिला गेला आहे.

वकील आणि महिलेची ओळख अद्याप स्पष्ट झालेली नाही. झी 24 तास या व्हिडीओची पुष्टी करत नाही. नेटिझन्सनी यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे वकील शशांक शेखर झा यांनी व्हिडिओ शेअर करत ''दिल्ली उच्च न्यायालय'' अशी कमेंट केली.

''तो व्यक्ती न्यायाधीश नसून वकील आहे. हे न्यायमूर्ती ज्योती सिंग यांच्या कोर्टचे आहे, आणि सत्र सुरू नव्हते,'' असे दिल्ली उच्च आणि सर्वोच्च न्यायालयातील वकील कुमार दीपराज यांनी सांगितले. एका यूजर्सने मिश्किलपणे लिहिले, ''यानंतर त्याला नक्कीच बढती मिळेल.'' या प्रकरणाने ऑनलाइन सुनावण्यांमधील व्यावसायिक शिस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.''

यापूर्वी जूनमध्ये गुजरात उच्च न्यायालयाने एका व्यक्तीला व्हर्च्युअल सुनावणीत अशोभनीय वर्तनासाठी १ लाख रुपये दंड आणि १५ दिवस सामाजिक सेवेची शिक्षा सुनावली होती.

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार, ४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२५

बो-टाय पास्ता सॅलड

साहित्य : १ वाटी बो-टाय पास्ता (टायचा बो अर्थात गाठीप्रमाणे आकार असलेला पास्ता), १०० ग्रॅम बोनलेस चिकन, ३ ब्रेड स्लाइस, ४-५ लसूण पाकळ्या, ५० ग्रॅम ऑलिव्ह तेल, १०० ग्रॅम प्रोसेस्ड चीझ, २ अंड्यांचे पिवळे बलक, मीठ चवीनुसार, ८-१० लेट्युसची पाने,



हवे असल्यास चिली फ्लेक्स.

कृती : सगळ्यात आधी पास्ता मिठाच्या उकळत्या पाण्यातून उकडून घ्या. बो-टाय पास्ता मिळाला नाही किंवा आवडत नसेल तर मॅक्रोनी किंवा तुमच्या आवडीचा पास्ता घेता येईल. पास्ता उकडल्यावर लगेचच पाण्याखाली गार करा आणि थोडं तेल लावून फ्रीजमध्ये ठेवा. लसणीचे बारीक बारीक तुकडे करून घ्या. चिकनला मीठ, मिरपूड लावून पॅनमध्ये थोड्याशा ऑलिव्ह तेलात शिजवून घ्या. ब्रेड स्लाइसचे छोटे छोटे चौकोनी तुकडे करून ते पॅनमध्ये भाजून घ्या. यात थोडंसं तेल आणि लसूण घालून त्याला छान लसणीचा स्वाद येऊ द्या. चीझ किसून ठेवा. अंड्याचे पिवळे बलक चांगले लुसलुशीत होईपर्यंत फेटून घ्या. त्यात चीझ घाला आणि थोडंसं ऑलिव्ह तेल घाला. मिश्रण फेटून घ्या.

एका बाऊलमध्ये लेट्युसची पाने, पास्ता, चिकन आणि ब्रेडचे तुकडे एकत्र टॉस करा. त्यावर बनवलेले चीझ आणि अंड्याचे ड्रेसिंग वाढा. आता हे सॅलड थंड करून पेश करा.

जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येकवेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.

फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांवर वापरणे योग्य आहे का?

संपूर्ण चेहऱ्यात डोळे हा फार नाजूक अवयव आहे. त्यात डोळ्यांच्या पापण्या हा तर अति संवेदनशील भाग आहे. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी व सौंदर्य टिकवण्यासाठी त्यांची डोळ्यांची योग्य निगा राखणे फार गरजेचे आहे.



तसेच चेहऱ्यासाठी वापरण्यात येणारे फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांसाठी योग्य नसतात. कारण ते पापण्यांच्या त्वचेसाठी त्रासदायक ठरू शकतात. मात्र जर तुमच्या भुवयांच्या केसांमध्ये कोंडा असणे किंवा तुम्हाला पापण्यांजवळील त्वचा कोरडी असण्याची समस्या असेल तर तुम्ही अगदी सौम्य स्क्रब वापरू शकता. यासाठी अति दाणेदार अथवा खरखरीत नसलेले एखादे सौम्य ॲप्रिकॉट स्क्रब तुम्ही घेऊ शकता. या स्क्रबचा काही भाग घ्या व त्यामध्ये थोडे मॉश्चरायझर मिसळून तुम्ही त्याचा हलक्या हाताने तुमच्या पापण्यांवर मसाज करू शकता. हा मसाज करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा हा मसाज क्लॉकवाइज करावा.



जर तुमच्या पापण्यांवरील केस पातळ व कमजोर असतील तर मात्र तुमच्या डोळ्यांच्या आजूबाजूला कोणतेही सौंदर्यप्रसाधने वापरू नका. जर तुमच्या पापण्यांवरील केस दाट असतील व तुम्हाला कोरड्या त्वचेची समस्या असेल तर तुम्ही वर दिलेले मिश्रण वापरू शकता. डोळ्यांच्या पापण्यांवर कोरफडाचे जेल अथवा मास्क वापरणे योग्य ठरेल.

सकाळची न्याहारी किती आवश्यक आहे!

सकाळची न्याहारी शरीरासाठी किती आवश्यक आहे, हे सर्वजण जाणत असूनही अनेक लोक सकाळच्या नाश्त्याकडे दुर्लक्ष करून घराबाहेर पडतात. त्याचे दुष्परिणाम मग त्यांच्या शरीरावर होतात.

सकाळचा नाश्ता निरोगी राहण्यासाठी फार महत्त्वाचा आहे. नाश्ता शरीरात ऊर्जा निर्माण करतो. नाश्ता करणारे लोक नाश्ता न करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक धडधाकट असतात. सकाळी उठल्यानंतर एक तासात नाश्ता करायला हवा. नाश्ता केल्याने मेंदूला चालना मिळते व एकाग्रता वाढायलाही मदत होते. शाळा-कॉलेजांत जाणारी बरीचशी मुले जी नाश्ता करत नाही, त्यांचे लक्ष अभ्यासात केंद्रित होत नाही. पण समतोल नाश्ता घेतला तर अनेक आजारांपासून आपला बचाव होऊ शकतो.



सकाळच्या नाश्त्यात प्रथिने, खनिज, व्हिटॅमिन, फायबर, काबोर्हायड्रेट इत्यादी घटकांचा समावेश करा. नाश्त्यामध्ये भाज्या, फळं, दूध, मोड आलेले कडधान्य, पनीर, दही, सालीच्या डाळी इत्यादींचा समावेश करा. तसेच संमिश्र भाज्या मिळवलेले पोहे, ओट्स, उपमा, दालिया, चिलाल चपाती, इडली, उकडलेले अंडे इत्यादी घेऊ शकता.

सकाळचा नाश्ता केल्यास हृदयरोग, अल्सर, मधुमेह, लठ्ठपणा यासारख्या आजारापासून बचाव होऊ शकतो.

आपल्याला होते फूड ॲलर्जी, तर हे करा

जेव्हाही आपले शरीर खाण्याप्रती अधिक क्रियाशील होते तेव्हा फूड ॲलर्जीची तक्रार होऊ शकते. अशात काही प्रोटीनयुक्त आहारदेखील आपल्या शरीराला नुकसान करू शकतात कारण काही लोकांची प्रतिकारशक्ती काही पदार्थांना प्रतिसाद देऊ शकत नाही आणि त्याचे दुष्परिणाम म्हणून ॲलर्जी दिसून येते. मुख्यतः लोकांना मैदा, सोया, अंडी, मासे, शेंगदाणे, काही विशिष्ट मसाले किंवा एखाद्या तेलाच्या प्रकारची ॲलर्जी असते. कधी कधी ॲलर्जी टेस्ट मध्येही ॲलर्जी नेमकी कसली आहे हे कळून येत नाही. अशात ते आपल्यालाच शोधून काढायला हवे. एकदा ॲलर्जी कोणत्या पदार्थाची आहे समजल्यावर पथ्ये पाळणे आवश्यक असतं.

सामान्यतः ॲलर्जीची ही लक्षणे असतात ▮ खाज सुटणे ▮ अतिसार ▮ डोळे, ओठ आणि चेहऱ्यावर सूज येणे ▮ श्वास घ्यायला त्रास होणे ▮ हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे

यापासून वाचण्यासाठी

▮ जर आपल्या खाण्यामुळे त्रास होत असेल तर खाण्याशी संबंधित सर्व धान्य टाळावे. ▮ बाहेर आहार घेताना विशेष काळजी घ्यावी.

लंचनंतर अजिबात नका करू हे काम

ब्रश करणे : लंचनंतर ब्रश करणे योग्य नाही. कारण आपण सिट्स असलेला आहार घेतला असल्यास ब्रश केल्याने दातांवरील ती परत निघून जाते ज्याला इनेमल असे म्हणतात.



अधिक पाणी पिणे : आपण जेवल्यानंतर अधिक मात्रेत पाणी पित असल्यास पाचक प्रणालीवर याचा गंभीर प्रभाव होतो. यामुळे अनेक रोग उद्भवण्याची शक्यता असते. खरं म्हणजे जेवताना आणि जेवण झाल्यावर लगेच पाणी पिणे विष समजले जाते. जेवण झाल्यावर कमीत कमी अर्धा किंवा तासाभरानंतर पाणी पिणे योग्य आहे.

फिरणे : काय आपण ही लंच घेतल्यानंतर फेऱ्या मारता? पण ही एक हानीकारक सवय आहे जी लगेच थांबवायला हवी. तज्ज्ञांप्रमाणे आमची पाचक प्रणाली इतकी मजबूत आहे की लंचमध्ये आपण कितीही अटरम- शटरम खाल्लं असेल तरी सर्वकाही पचून जातं. या दरम्यान आमची प्रणाली आहाराला पचवून सर्व आवश्यक पोषण आम्हाला ऊर्जेच्या रूपात देतं. पण आमचे हे सिस्टम जरा संवेदनशील असल्यामुळे तेव्हा त्याला आपले कार्य सुरळीतरीत्या पार पडण्यात अडथळा निर्माण होतो जेव्हा आपण त्याला यातना देतात. म्हणून दुपारी लंच केल्यानंतर फिरणे किंवा काही हेवी कार्य करण्याऐवजी १५ ते २० मिनिटे आराम करण्याचा सल्ला दिला जातो.

ड्रायव्हिंग : जेवण पचवण्यासाठी अधिक रक्ताची गरज असते, ज्यासाठी मेंदू मदत करतं. परंतु जेवल्यानंतर आपण ड्रायव्हिंग करत असाल तर मेंदू त्यावर आपलं लक्ष केंद्रित करतो आणि जेवण पचवण्यात त्याची मदत मिळत नाही.

झोपणे : लंचनंतर लगेच झोपल्याने पचन संबंधी रोग होऊ शकतात. याने आपल्या गॅससंबंधी समस्याही उद्भवू शकते.

फोनचे ब्लूटूथ नेहमी ऑन असते?

मिनिटात होऊ शकते डिव्हाइस हॅक, असे राहा सेफ

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये नेहमी ब्लूटूथ चालू ठेवत असाल तर, सावध व्हा. कारण, यामुळे तुमचा फोन हॅक देखील होऊ शकतो. जाणून घेऊया याबद्दल सविस्तर. ब्लूटूथ सर्व फोनमध्ये असते आणि बरेच लोक ते सतत वापरतात सुद्धा. स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉपमध्ये ब्लूटूथ आधीच दिलेले आहे. एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसमध्ये फाइल ट्रान्सफर करण्यासाठी ब्लूटूथची आवश्यकता असते. पण तुम्हाला माहीत आहे का? डिव्हाइसमध्ये असलेले ब्लूटूथ जितके सोयीस्कर आहे तितकेच ते धोकादायकसुद्धा असू शकते. हॅकर्स ब्लूटूथद्वारे तुमचे डिव्हाइस हॅक करू शकतात. त्याला ब्लूबगिंग असेही म्हणतात. ब्लूटूथ हॅकिंग कसे केले जाते आणि त्यापासून तुम्ही कसे सुरक्षित राहू शकता, याबद्दल ही महत्त्वाची माहिती.

ब्लूटूथ हॅकिंग कसे काम करते?



हॅकर्स एक विशिष्ट सॉफ्टवेअर वापरतात, जे आपोआप ब्लूटूथने सुसज्ज असलेली उपकरणे शोधतात. हॅकर्स हेदेखील पाहू शकतात की, तुमचे डिव्हाइस आधी कोणत्या नेटवर्कशी कनेक्ट केले गेले आहे. फोन आधीपासून कनेक्ट केलेले नेटवर्क पुरेसे विश्वासार्ह मानतो आणि भविष्यात त्यांच्याशी आपोआप कनेक्ट होतो. सायबर गुन्हेगारांना तुमच्या डिव्हाइसचे विश्वसनीय नेटवर्क माहीत असल्यास, ते त्याद्वारे तुमच्या डिव्हाइसशी कनेक्ट होतात. यानंतर तुमचे डिव्हाइस हॅक होते. त्यानंतर हॅकर्स डिव्हाइसमध्ये मालवेअर इन्स्टॉल करतात. याद्वारे हॅकर्स तुमची हेरगिरी करतात. तुमचे मेसेजेस वाचतात आणि डेटा देखील चोरू शकतात.

यापासून सुरक्षित कसे राहायचे?

डिव्हाइस वापरात नसताना ब्लूटूथ डिसेबल करा. तुम्हाला फाइल्स ट्रान्सफर करायच्या असतील तर, तुम्ही एयर ड्रॉप किंवा फास्ट शेयर वापरू शकता. ब्लूटूथ सेवांची प्रवेशक्षमता मर्यादित करा. हे ब्लूबगिंग टाळते. तुमच्या स्मार्टफोन, टॅबलेट आणि ब्लूटूथ सक्षम संगणकांवर तुमच्याकडे ॲंटीमालवेअर ॲप स्थापित असल्याची खात्री करा. एखाद्या हॅकरने तुमच्या डिव्हाइसमध्ये शिरण्याचा प्रयत्न केल्यास, ॲंटी-मालवेअर ॲप तुमची गोपनीयता आणि वैयक्तिक डेटा संरक्षित करताना संशयास्पद ॲक्टीव्हीटीज शोधू आणि ब्लॉक करू शकतो.

वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

सँडविचमध्ये लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?

चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक



त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर : लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

त्वचेसाठी वरदान आहे कांदा : कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय ॲंटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात ॲंटी सेप्टिक, ॲंटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

कसा करावा वापर : तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

बाजारात मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वांत नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



साहित्य : एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

कृती : बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

'ब्लॅक टी'चे असेही फायदे

ब्लॅक टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणारी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते. टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.


चहात ॲण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.



ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील ॲण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.

इंटरनेटवरील नको त्या गोष्टींपासून मुलांना असे ठेवा दूर

आजच्या डिजिटल जगात, इंटरनेटचा वापर थोरा-मोठ्यापासून ते लहान मुलापर्यंत प्रत्येक व्यक्ती करतो. लहान मुलांना इंटरनेटवर सहसा ऑनलाइन व्हिडीओ किंवा त्यांच्या वयोगटाशी संबंधित कार्टून इत्यादी यूट्यूबवर पाहायला आवडते. मात्र इंटरनेटवर अनेक प्रकारचे कंटेंट उपलब्ध असतात. ज्यामुळे मुले भरकटू शकतात. असे होऊ नये याकरिता मुलांच्या इंटरनेट ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे आणि त्यासाठी सुरक्षित पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. तुम्हालाही तुमच्या मुलांचा इंटरनेट वापर सुरक्षित ठेवायचा असेल तर, ही माहिती तुमच्यासाठी. यामध्ये आज आम्ही चुकीच्या कंटेंटपासून



मुलांचे संरक्षण करण्याच्या काही सोप्या टिप्स सांगणार आहोत. जाणून घेऊया.

पॅरेंट्स कंट्रोल्स वापरा :

आजकाल गुगलसह यूट्यूब आणि इंस्टाग्रामसारख्या अनेक प्लॅटफॉर्मवर पेरेंट्स कंट्रोल सुविधादेखील उपलब्ध आहे. तुमची मुले नियमितपणे वापरत असलेले ॲप्स नियंत्रित करण्यासाठी तुम्ही याचा वापर करू शकता.

मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा

हे सर्वांत महत्त्वाचे काम आहे. कारण मुलांच्या ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवणे सोपे काम नाही. अशात, मुलांना इंटरनेटवरील धोक्यांची माहिती देणे आणि त्यांना इंटरनेट वापरण्याच्या योग्य मार्गांची जाणीव करून देणे आवश्यक आहे. यासोबतच मुलांना ऑनलाइन पेमेंट आणि मालवेअरच्या धोक्यांबाबत आवश्यक माहिती दिली पाहिजे.

स्वतंत्र ई-मेल आयडी तयार करा :

तुम्ही मुलांसाठी वेगळा ई-मेल आयडी देखील तयार करू शकता, त्यामुळे वेब ब्राऊझिंग दरम्यान अनावश्यक जाहिराती टाळता येतील. यासोबतच तुमची मुलं कोणत्या प्रकारचा कंटेन्ट पाहत आहे याची अचूक माहितीही तुम्हाला मिळेल. त्याच वेळी, नवीन ई-मेल आयडीवरून ब्राऊझरच्या मदतीने तुम्ही असुरक्षित वेबसाइट आणि कुकीज बंद करू शकता.

स्मरणशक्ती वाढवण्यासाठी 'हाकिनी योगमुद्रा' उपयुक्त

नववर्षाचा उल्लास आता सरला आहे आणि विद्यार्थी वर्गाला आता वेध लागले आहेत ते लवकरच येणार असलेल्या वार्षिक परीक्षांचे. सर्वसाधारणपणे मार्च ते एप्रिल महिन्यांच्या दरम्यान होणार असलेल्या या परीक्षांची तयारी, विद्यार्थी आतापासून करण्यास सुरुवात करीत असतात. पालकही या काळामध्ये मुलांच्या खाण्या-पिण्याची, त्याच्या तब्येतीची काळजी घेण्यामध्ये कोणतीही कसर बाकी ठेवत नाहीत. या काळामध्ये मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योग्य आहार, नियमित आणि पुरेशी झोप मुलांना मिळणे आवश्यक असते. यामुळे शारीरिक आणि मानसिक तणाव दूर होण्यास मदत होते. मुलांची स्मरणशक्ती चांगली राहावी, याकरिता योगसाधनेची मदतदेखील घेता येऊ शकेल. मेंदू सक्रिय राहून स्मरणशक्ती चांगली राहावी याकरिता योगसाधनेमध्ये हाकिनी मुद्रा सांगितली गेली आहे. एखाद्या गोष्टीचा विसर पडत असल्यास ही मुद्रा लावून त्या वस्तूचे स्मरण करण्याचा प्रयत्न केल्याने ती गोष्ट आठवण्याची शक्यता मोठी असते. विद्यार्थ्यांच्याखेरीज ज्यांना वारंवार काही ना काही गोष्टी विसरण्याची सवय असते, त्यांच्यासाठी देखील ही मुद्रा लाभदायी आहे. ही मुद्रा करण्यासाठी दोन्ही हातांच्या पाचही बोटांचे अग्रभाग जुळवावे. त्यानंतर डोळे वरच्या बाजूला फिरवून त्यांवर अगदी हलका ताण द्यावा. श्वास घेत आपली जीभ हिरड्यांना टेकवावी. त्यानंतर श्वास सोडत जीभ पूर्वस्थितीत आणावी. ही मुद्रा करताना श्वासोच्छ्वास दीर्घ असावा. विद्यार्थ्यांकरिता स्मरणशक्ती वाढवण्याच्या दृष्टीने ही मुद्रा अतिशय लाभदायक आहे.




पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार, ४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२५

संपादकीय

मोठे व्हा, पण आमच्यापेक्षा नको



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागल्यामुळे सगळ्याच राजकीय पक्षांनी सावध पवित्रा घ्यायला सुरुवात केली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा गणेशोत्सवात जेव्हा मुंबई भेटीवर आले होते तेव्हा त्यांनी यावेळी मुंबईचा महापौर हा भाजपचा व्हायला हवा, असे आवाहन भाजपच्या कार्यकर्त्यांना केले होते. कालही ते मुंबईत आले होते तेव्हा त्यांनी आगामी निवडणुकांमध्ये असे लढा की विरोधक शिल्लक राहता कामी नये, असे आवाहन भाजपच्या कार्यकर्त्यांना केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अलीकडेच जाहीर केले आहे की, मुंबई महापालिका महायुती म्हणून लढवली जाईल, पण इतर महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजप स्वबळावर लढेल. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अस्वस्थ झाले. त्यांनी शनिवारी थेट दिल्ली गाठली आणि आपली चिंता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे व्यक्त केली. एकनाथ शिंदे यांना मुंबईमध्ये महायुती म्हणून लढताना समसमान जागा हव्या आहेत, त्याच वेळी राज्यातील सगळ्याच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुती म्हणून निवडणुका लढविण्यात याव्यात, अशी विनंती त्यांनी पंतप्रधान मोदींकडे केली आहे. अर्थात, याविषयी आपण अमित शहा आणि देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलतो, असे आश्वासन मोदींनी शिंदे यांना दिले. एकनाथ शिंदे यांचा आता कसोटीचा काळ आहे. भाजपने त्यांच्या हाती खरी शिवसेना बहाल करण्यासाठी मदत केली, पण आता त्यांना खऱ्या शिवसेनेसारखी वागणूक देणार का, ते पहावे लागेल.

भाजपला जेव्हा शिंदेंची गरज होती, त्यावेळी त्यांनी त्यांच्या बंडाला प्रोत्साहन आणि बळ दिले. त्यामुळे शिवसेना फुटली, परिणामी उद्धव ठाकरे यांनी आपले सरकार अल्पमतात जाणार या भीतीने अगोदरच राजीनामा दिला आणि रातोरात वर्षा बंगला सोडला. त्यावेळी भाजपने एकनाथ शिंदे यांना गुवाहाटीपर्यंत नेले, तिथून परत आणल्यावर आपल्यासोबत घेऊन राज्यात महायुतीची सत्ता स्थापन केली. मी पुन्हा येईन, असा आत्मविश्वास जाहीरपणे व्यक्त केलेले देवेंद्र फडणवीस यांना वाटत होते की, आपणच पुन्हा मुख्यमंत्री होऊ, पण झाले भलतेच, जे पाहुणे म्हणून सोबत आले होते, त्यांना मुख्यमंत्रीपदी बसवण्यात आले. त्यामुळे राज्यातील फडणवीस आणि भाजपचे नेते, कार्यकर्ते नाराज झाले. पण एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपदी बसवण्याचा निर्णय केंद्रातून झाला होता. अर्थात, तो मोदींशी विचारविनिमय करून अमित शहांनी घेतलेला होता. याच न्यायाने आपल्याला २०२४ साली झालेल्या राज्यातील विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर मुख्यमंत्रीपद मिळेल, असे शिंदेंना वाटत होते. इतकेच नव्हे तर त्यांनी त्यासाठी जोरदार तयारी चालवलेली होती. लोकसभा निवडणुकीत महायुतीचा सफाया झाला होता, पण विधानसभा निवडणुकीनंतर केंद्रातील भाजपच्या प्रमुख नेत्यांनी मध्य प्रदेशमध्ये यशस्वी ठरलेली 'लाडली बहेन' ही योजना 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' म्हणून महाराष्ट्रात आणली. त्याचा परिणाम होऊन महायुतीला विधानसभा निवडणुकीत आश्चर्याचा धक्का देणारे यश मिळाले.

मी मुख्यमंत्री असताना ही योजना लागू केली, त्यामुळे मोठे यश मिळाले, मी राज्यातील बहिणींचा लाडका भाऊ आहे, त्यामुळे मुख्यमंत्रीपद मलाच मिळायला हवे, असा हट्ट एकनाथ शिंदे यांनी धरला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. कारण भाजपकडे जागा जास्त होत्या आणि त्यावेळी अजित पवार सोबत असल्यामुळे भाजपला चिंता नव्हती. त्यामुळे उपमुख्यमंत्रीपदावर राजी होण्याशिवाय शिंदेंकडे पर्याय नव्हता.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कुठलाही पक्ष आपल्या स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त संधी देऊन आपला पक्ष अधिक बळकट करत असतो. भाजप हा राष्ट्रीय पक्ष आहे, त्यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना गरज होती, म्हणून सोबत घेतले आहे. त्यांना मोठे करण्यासाठी नाही. त्यामुळे आपल्या कार्यकर्त्यांना जास्तीत जास्त संधी देऊन राज्यात आपले स्थान मजबूत करण्याचा भाजपचा प्रयत्न असेल. शिंदे यांची मुख्य लढत ही उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेशी असेल तर अजित पवार यांची मुख्य लढत ही शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसशी असेल. कारण ते एकमेकांचे कडवे प्रतिस्पर्धी आहेत. दुर्सया बाजूला उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी एकत्र येतील, असे वातावरण निर्माण होत आहे. ते जर एकत्र आले तर त्याचा मोठा फटका एकनाथ शिंदे यांना बसू शकतो, त्यामुळेच ते पुढील निवडणुकांना एकट्याने सामोरे जावू इच्छित नसावेत. त्यामुळेच त्यांनी राज्यातील महापालिकांच्या निवडणुका एकत्र महायुतीच्या माध्यमातून लढण्याची विनंती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केली असावी. एका बाजूला ठाकरे बंधू एकनाथ शिंदे यांना मागे खेचण्यासाठी सज्ज होत आहेत, तर दुर्सया बाजूला राज्यातील भाजपचे नेते आपल्याच लोकांना निवडणुकीत जास्तीत जास्त संधी कशी मिळेल यासाठी जोर लावत आहेत. त्यामुळे शिंदे यांची कोंडी होताना दिसत आहे.

त्यामुळे शिंदेंनी थेट केंद्रीय नेतृत्वाकडे धाव घेतली असावी. पण तिथेही सध्या तरी त्यांना विचार करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. राष्ट्रीय पक्ष आपला विस्तार आणि प्रभाव वाढण्यासाठी प्रादेशिक पक्षांची मदत घेत असतो, पण त्याचे धोरण त्या पक्षांना मोठे करण्याचे नसते. उपयोग करण्याचे असते. पूर्वीच्या शिवसेनेला भाजपकडून तोच अनुभव आला. आता त्यांची जागा एकनाथ शिंदे यांनी घेतली आहे. भाजपने भिडू बदलला, पण धोरण कसे बदलणार?

प्रवासी नियमावली आली, पण सुरक्षिततेचे काय?

शयनयान बसमधल्या वाढत्या अपघातांमुळे सध्या सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या अपघातात प्रवासी गंभीर जखमी होतात किंवा त्यांचा मृत्यू होतो, काही दिवसांपूर्वीच कर्नूल येथे दुचाकीला धडकल्यानंतर बसला आग लागून २० जणांचा मृत्यू झाला. शयनयान बसच्या अपघातांसाठी अनेक कारणे असतात, ज्यात बसची किचकट रचना, प्रवासी गाढ झोपेत असणे आणि आपत्कालीन परिस्थितीतून बाहेर पडण्यात येणाऱ्या अडचणीमुळे मानवी प्राणहानी मोठ्या प्रमाणात होते.



सध्या या गोष्टी चर्चेला येण्याची कारणे म्हणजे गेल्या दिवसात या बसच्या अपघातात झालेली वाढ ही आहे. १० ते २४ ऑक्टोबर या केवळ १२ दिवसांत देशभरात वेगवेगळ्या ठिकाणी १२ शयनयान बसला अपघात झालेत. कर्नूल अपघात घटनेत हैदराबादहून बंगळूरुला जाणारी स्लीपर बस एका दुचाकीला धडकली, त्यानंतर बसला भीषण आग लागली यात २० प्रवाशांचा मृत्यू झाला आणि अनेकजण जखमी झाले. कारण म्हणे तर अपघातानंतर बसमधील एका प्रवाशाच्या बॅटरीचा स्फोट झाला आणि बसमध्ये आग लागली. बसमधील प्रवासी गाढ झोपेत होते, ज्यामुळे ते आगीतून बाहेर पडू शकले नाही. आग्रा-लखनऊ एक्स्प्रेसवे अपघात (जुलै २०२४) एका स्लीपर बसने टँकरला धडक दिली. यात १८ जणांचा मृत्यू झाला. कारण काय तर जोरदार धडकेमुळे बसचे मोठे नुकसान झाले. स्लीपर बस अपघातांची कारणे शोधता, असे लक्षात येते की, अपघातावेळी प्रवाशांना बाहेर पडणे कठीण होते, कारण बसच्या डिझाइनमुळे आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग बंद होतात. काही बसेसमध्ये एकावेळी ३० ते ४० प्रवासी बसू शकतात, ज्यामुळे बाहेर पडण्यात अडचणी निर्माण होतात.

शयनयान बसमध्ये प्रवासी झोपलेले असल्याने, अपघात झाल्यावर लगेच प्रतिसाद देणे शक्य होत नाही. अपघातानंतर आगीमुळे किंवा इतर कारणांमुळे लोकांना लगेच मदत मिळणे कठीण होते आणि प्राणहानी वाढते. सध्या वाहतूक मंत्रालय स्लीपर बसच्या डिझाइनमधील त्रुटी दूर करण्यासाठी विचार करत आहे. मात्र ही चर्चा केवळ एखादा मोठा अपघात झाला की होते आणि पुन्हा सर्व आहे तशीच होते. अपघाताच्या वेळी सुरक्षित बाहेर पडता यावे यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. बसची नियमित देखभाल करणे आणि टायरची तपासणी करणे हे अपघाताची शक्यता कमी करण्यासाठी महत्त्वाचे आहे. शयनयान (स्लीपर) बसच्या अपघातांची वाढ ही चिंतेची बाब आहे.अपघातांचे मुख्य कारण म्हणजे मर्यादित जागेमुळे प्रवाशांना आपत्कालीन परिस्थितीतून बाहेर पडणे कठीण होते, ज्यामुळे मृत्यू आणि दुखापतीची संख्या वाढते. याशिवाय, काही बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आणि सीट बेल्ट सारख्या सुरक्षा उपकरणांचा अभाव आहे, ज्यामुळे अपघातांची जोखीम अधिक वाढत आहे. या बसेसच्या डिझाइनमध्ये त्रुटी असतात. काही डिझाइनमध्ये प्रवाशांना अपघाताच्या वेळी बाहेर पडण्यासाठी योग्य मार्ग नसतात, ज्यामुळे ते अडकून राहू शकतात.

आज स्लीपर बाबतीत म्हणायला गेलं तर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची काय स्थिती आहे. आज एसटीकडे एकूण २५० स्लीपर बस आहेत त्यात स्लीपर सीटर २०० असून संपूर्ण शयनयन बस या ५० आहेत. या संपूर्णपणे श्रेणी प्रकारातील आहेत मात्र या सर्व बस साध्या बस गाड्या आहेत त्या वातानुकूलित नाहीत. मात्र आज या बस गाड्यांची अवस्था पाहता या बसमध्ये बसावे की झोपावे हे काहीच कळत नाही इतकी बिकट अवस्था आज महामंडळाने या स्लीपर बस गाड्यांची करून ठेवली आहे यात सर्व आपत्कालीन दरवाजे हे पत्र ठोकून बंद करण्यात आले आहेत त्यामुळे एखाद्या कठीण प्रसंगी प्रवाशांच्या जीवावर बेतण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यात बसच्या पडद्यांची अवस्था वाईट असून तर काही बसला पडदेच नाहीत. प्रवाशांना आपत्कालीन दरवाजे तसेच त्या बाबत सूचना करण्याची कोणतीच यंत्रणा नाही या बस गाड्या रात्री प्रवास करून झाल्यानंतर साफसफाई केल्या जात नाहीत त्यामुळे आतमध्ये बस गाड्यांची अवस्था अत्यंत बिकट झालेली दिसते. एसटी महामंडळाच्या या बस गाड्या सध्या सर्रास दिवसा धावताना दिसतात, तर काही छोट्या व लोकल मार्गांवरही स्लीपर बस गाड्या पाठवल्या जातात रात्री प्रवास करून झाला की दिवसा या बस गाड्या लोकल बस मार्गावर चालवल्या जातात व पुन्हा रात्री चालवल्या जातात त्यामुळे बस गाड्यांची अवस्था अत्यंत बिकट होऊन बसली आहे. संपूर्ण पैसे मोजूनही व वारंवार तक्रारी करूनही एसटी महामंडळ त्याकडे लक्ष देत नाही विशेष म्हणजे या शयन यान बस गाड्यांचा एक वेगळा ब्रँड तयार करावयास व्हावा होता मात्र एसटीला ते जमले नाही. विशेष बोलायचं झालं तर स्लीपर बस गाड्यांचे आकर्षण हे फक्त भारतातच आहे इतर कोणत्याही देशांमध्ये स्लीपर गाड्यांचा वापर हा प्रवाशांसाठी केला जात नाही. भलेही इतर देशांची भौगोलिक रचना वेगळी व भारतातील भौगोलिक परिस्थिती वेगळी असली तरी, परदेशात कोणत्याही देशात स्लीपर गाड्या या वापरल्या जात नाहीत फक्त भारतातच याचे मोठे फॅड बनले आहे.

बरं याच्यात सुरक्षिततेचे कोणतीच नियम पाळली जात नाही, तर आपल्या इथे भ्रष्टाचाराचे कसे टोक गाठले जाते ते येथे पाहता येईल कोणत्याही बस गाड्यांमध्ये सुरक्षिततेचे कोणतेही नियम पाळले जात नाही या बस गाड्या बनवतानाही त्या देशातल्या कोणत्याही भागात बनवल्या जातात मात्र त्यावेळेस त्यांना तेथील आरटीओ मान्यता देत नाहीत मग या बस गाड्या रजिस्ट्रेशनसाठी चक्क पॉण्डेचरी, नागालँड, अरुणाचल प्रदेश यासारख्या ठिकाणी रजिस्टर होऊन येतात. मग देश एक व सगळीकडे वेगवेगळे आरटीओ नियम का? स्लीपर बस गाड्या चालवण्यामागे एक मोठा ब्रेकेट आहे. त्यात या बस गाड्या चालवण्यापासून रस्त्यावर वाहतूक करण्यासाठी सर्व बांधलेले असतात. त्यामुळे सर्रास वाहतूक सुरू असते. मात्र एखादा अपघात घडला की थोडेफार दिवस कारवाई होते. मात्र पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. मग दुसरा एखादा अपघात होईपर्यंत सर्व शांत. तसे बघायला गेले तर स्लीपर बसचा प्रवास बसून करण्यापेक्षा धोकादायकच आहे. या प्रवासात अपघात झाल्यानंतर बाहेर पाडण्याचे मार्गच बंद होतात. त्यात आग लागली तर बसमधील पडदे पेट घेतात. बसमधील पार्टीशनसाठी सर्रास लाकूड वापरले जाते ते पेट घेते आणि काही कळायच्या आत मनुष्यहानी व वित्तहानी होते. १ जुलै २०२३ रोजी नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गावर स्लीपर बसला लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला होता, या अपघातानंतर सर्व स्लीपर बसची झाडाझडती सुरु झाली होती, मात्र काही दिवसाच्या आत सर्व बस या रस्त्यांवर धावू लागल्या. यातच सर्व काही आले. त्यातच आता परिवहन विभागांनी स्लीपर बस ने प्रवास करताना प्रवाशांसाठी नवीन नियमावली जाहीर केली आहे. त्यात प्रवास करताना प्रवाशांनी कशी काळजी घ्यावी याचा उल्लेख आहे. मात्र येथे सुद्धा प्रवाशांना वेठीस धरण्याचा परिवहन विभागाचा प्रयत्न दिसतो. मुळात बस गाड्यांची अवस्था वाईट असणे त्यात कोणतीही सुख-सुविधा नसणे उदाहरणार्थ प्रत्येक खिडकीजवळ हातोडा असणे हे गृहीत धरले आहे. मात्र सर्व बसगाड्यातील हातोडे हे गायब झाले आहेत. आपत्कालीन दरवाजांचा तर पत्ताच नाही. अशी अवस्था आहे, मग नियम हे कोणासाठी? जर तेच परिवहन विभागाने बस गाड्यांवर लक्ष ठेवले व थोडा यातील भ्रष्टाचार कमी केला तर यथावकाशच अपघात टाळतील हे नक्की.

हेचि परमसेवा

ब्रिटिश लेखक आणि तत्त्वज्ञ एल्डॉस हक्सले यांनी गीतेतील कर्मयोग आणि ज्ञानयोग या संकल्पनांवर जोर दिला. त्यातही 'कर्म करा; परंतु फळाची अपेक्षा करू नका,' यावर भर दिला. आयरिश कवी डब्ल्यू. बी. यीट्सने भगवद्गीतेचा आपल्या कवितेवर आणि विचारांवर प्रभाव असल्याचे सांगितले. त्यांनी गीतेतील 'आत्मसाक्षात्कार' आणि 'ब्रह्मांड' या संकल्पनांवर भाष्य केले. श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'या गीतार्थाची थोरी। स्वये शंभू विवरी। तेय भवानी प्रश्नू करी। चमत्कारोनी।। तेथ हरू म्हणे नेणिजे। देवी जैसे का स्वरूप तूझे। नित्य नूतन देखिजे। गीता तत्त्व।।'. 'हि अक्षरे नव्हती देखा। ब्रह्मसाम्राज्य दीपिका। अर्जुना लागी चित्कळीका। उजळील्या श्रीकृष्णे।।' भगवद्गीता हे जीवन परिपूर्ण करणारे शास्त्र आहे. युद्धभूमीवर अर्जुनाला भगवंतांनी केलेला उपदेश भगवान व्यासांनी सूत्रबद्ध करून अठरा अध्यायांमध्ये मांडणी केली. अर्जुन कर्म टाकू पाहत होता. काके, मामे, आप्तेष्ट समोर आहेत. त्यांना मारून ते रक्तलांच्छित राज्य मिळवण्यात काय फायदा, असा त्याचा प्रश्न होता. या कर्माने जे पाप मी करतो आहे; त्यामुळे तू अंतरशील, तेव्हा हे युद्ध नको, अशा भूमिकेतून गाण्डीव धनुष्य खाली ठेवणाऱ्या अर्जुनाला युद्धासाठी, म्हणजे प्राप्त कर्तव्य कर्म करण्यासाठी भगवंतांनी उद्युक्त केले, तो उपदेश म्हणजे भगवद्गीता. स्वामी माधवनाथ म्हणत, 'भगवंतांनी असे म्हटले नाही, की तुला युद्ध नको ना, तर ठीक आहे. आपण दोघे दोन जपमाळा घेऊ आणि नाम घेत बसू.' उलट ते म्हणतात, 'उठ लढायला तयार हो. विहितकर्म करणे आवश्यकच आहे.' 'ते विहित कर्म पांडवा। आपुला अनन्य ओलावा। आणि हेचि परमसेवा। मज सर्वात्मकाची।।' आपल्या विहित कर्मांनी सर्वात्मक प्रभूची सेवा करण्याची मोठी संधी मिळाली आहे. निसर्ग हेच शिकवतो. सूर्यनारायण नित्य उगवतो, जगाला ऊर्जा देतो. तसे प्राप्त कर्तव्य कमार्बाबत आपणही आळस करता उपयोगी नाही.

वैद्यकीय अहवाल बदलण्यासाठी दबाव टाकणारे नरराक्षस



ही घटना आहे १९ मे २०२४ रोजीची. पुण्यातील कल्याणीनगरमध्ये एका अलिशान पोर्शे गाडीने एक तरुण आणि एक तरुणी अशा दोन इंजिनीअरना चिरडले. ज्या युवकाने हा अपघात केला तो मद्यधुंद अवस्थेत होता आणि अल्पवयीन होता, शिवाय तो श्रीमंत घरातील होता. त्यामुळे तो मद्यधुंद अवस्थेत नव्हता असा रक्ताचा अहवाल देण्यासाठी त्या मुलाच्या वडिलांनी दोन डॉक्टरांना पैसे दिले आणि या दोन्ही डॉक्टरांनी पैशांसाठी डॉक्टरी पेशाची मूल्ये आणि तत्वे पायदळी तुडवली. या प्रकरणात रक्ताचे नमुने बदलण्याचा आरोप असलेले पुण्यातील ससून रुग्णालयातील फॉरेन्सिक सायन्स विभागाचे तत्कालीन प्रमुख डॉ. अजय तावरे, कॅज्युअल्टी मेडिकल ऑफिसर (सीएमओ) डॉ. श्रीहरी हळनोर यांची वैद्यकीय नोंदणी यंदा एप्रिलमध्ये महाराष्ट्र मेडिकल काऊन्सिलने (एमएमसी) रद्द केली. या दुर्घटनेनंतर तपास सुरू झाल्यानंतर दोषी आढळलेल्या या दोन्ही डॉक्टरांना २७ मे २०२४ रोजी अटक करून त्यांची रवानगी येरवडा मध्यवर्ती रुग्णालयात करण्यात आली होती. डॉ. अजय तावरेच्या सूचनेनंतर डॉ. श्रीहरी हळनोर यांनी रक्ताचे नमुने बदलले होते. याच मुलाच्या रक्ताचे नुमने औंध जिल्हा रुग्णालयात तपासले असता अहवालात तफावत आढळली. त्यामुळे या डॉक्टरांचा नमुने बदलून चुकीचा अहवाल देण्याचा घोटाळा उघड झाला.

दुसरी ताजी घटना २३ ऑक्टोबर २०२५ रोजीची आहे. डॉ. संपदा मुंडे या डॉक्टर तरुणीने आत्महत्या केली. सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात ती वैद्यकीय अधिकारी होती. फलटणमधील एका हॉटेलमध्ये तिने २३ ऑक्टोबरच्या रात्री गळफास घेऊन आयुष्याची अखेर केली. तिने आत्महत्येपूर्वी हाताच्या तळव्यावर सुसाईड नोट लिहिली होती. डॉक्टराने आत्महत्या करण्यापूर्वी हातावर दोघांची नावे लिहिली आहेत. यात पोलीस निरीक्षक गोपाल बदने याचे नाव आहे. त्याने तिच्यावर अनेकदा लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला. तसेच दुसरे नाव प्रशांत बनकर याचे होते. तो सॉफ्टवेअर इंजिनीअर असून तो मानसिक आणि शारीरिक छळ करायचा, असा आरोप आहे. डॉ. संपदा मुंडे प्रशांत बनकर यांच्या घरात भाड्याने राहात होती. या प्रकरणात पोस्ट मॉर्टेम रिपोर्ट बदलण्यासाठी तिच्यावर राजकीय आणि पोलिसांचा दबाव होता, असा गंभीर आरोप मृत डॉक्टर संपदा मुंडे हिच्या नातेवाईकांनी केला आहे.

वरील दोन्ही घटनांकडे बारकाईने पाहिले तर वैद्यकीय अहवाल बदलण्यासाठी दबाव येतो, हे स्पष्ट होते. शिवाय वैद्यकीय अहवाल बदलला जाऊ शकतो, हेही स्पष्ट होते. कारण पुण्यातील कल्याणीनगरमधील पोर्शे कार दुर्घटनेत रक्ताचे नमुने बदलण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीला वाचवण्यासाठी आणि पैशांच्या लोभापायी वैद्यकीय अहवाल बदलला जात असेल ती खूप मोठी गंभीर बाब आहे. किंबहुना, हा एखाद्या हत्येपेक्षा मोठा गुन्हा आहे. कारण एखाद्या हत्येनंतर आरोपीला वाचवण्यासाठी वैद्यकीय मूल्ये आणि तत्वे पैशासाठी पायदळी तुडवली जात असतील तर विश्वास कुणावर ठेवायचा, असा प्रश्न उपस्थित होतो. न्यायालय वैद्यकीय अहवालांवर विश्वास ठेवते. आणि जर वैद्यकीय अहवालांमध्येच हेराफेरी केली असेल, तर त्याचा परिणाम कदाचित योग्य व्यक्तीला न्याय न मिळण्यात होऊ शकतो. डॉ. संपदा मुंडे ही शवविच्छेदन (पोस्ट मॉर्टेम) करायची. अशावेळी तिच्यावर कायम चुकीचे रिपोर्ट देण्यासाठी दबाव असायचा, असा आरोप मृत डॉक्टरच्या काकांनी तसेच आतेभावाने माध्यमांशी बोलताना केला आहे. या संदर्भात एका खासदाराच्या दोन पीएंचे फोन यायचे, पोलिसांकडून दबाव यायचा, असे आरोप आहेत. हे जरी आरोप असले, सिद्ध झालेले नसले तरी त्या डॉक्टरने याआधी अशा तक्रारी तिच्या नातेवाईकांकडे केल्या होत्या. याचाच अर्थ कुठेतरी पाणी मुरतंय! आता हे भ्रष्टाचाराचे पाणी कुठे मुरतंय हे शोधण्याची जबाबदारी पोलिसांची आहे.

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार, ४ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर २०२५



टँकरमधून होणाऱ्या पाण्याच्या गळतीमुळे अपघाताचा धोका

विरार,

हिवाळा सुरू व्हायच्या आधीच वसई- विरारमधील नागरिकांना पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे पाणी टँकरच्या मागणीत पुन्हा वाढ झाली असून शहरातील रस्त्यांवर टँकरची संख्या वाढली आहे.

बेदरकारपणे चालणाऱ्या या टँकरमधून सातत्याने पाण्याची गळती होत असल्याने रस्ते निसरडे होऊन अपघातांची शक्यता वाढली आहे. यामुळे गळत्या टँकरवर कारवाई करण्याची मागणी नागरिक करत आहेत. वाहतूक आणि पोलीस यांना अनेक वेळा मागणी करूनही टँकर वाहतुकीच्या वेळा मर्यादित झालेल्या नाहीत. तसेच वाहतूक पोलिसांना गळत्या टँकरवर कारवाई करण्याचे सुद्धा सांगितले होते. पण अद्यापही या बाबत कोणतीही कारवाई झाल्याचे दिसत नाही. केवळ चिरीमिरीच्या नादात वाहतूक पोलीस टँकरवर कारवाई करत नसल्याच्या तक्रारी आहेत.

यामुळे शहरातील नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. या गळत्या टँकरमुळे विरार पूर्वेकडील नारंगी बायपास रस्त्याची दुरवस्था झाली आहे. रस्त्याच्या मधोमध मोठं मोठे खड्डे पडले आहेत. काही महिन्यांपूर्वी याच रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले होते. पण या टँकरमुळे हा रस्ता निकामी झाला आहे. या रस्त्यावर दरदिवशी अपघाताच्या घटना घडत आहेत. वसईत विरार परिसरात १ हजार हून अधिक टँकर पाणी सेवा पुरवत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे, पण हा आकडा अधिकृत नाही. परंतु तंदुरुस्ती दाखल्यासाठी आलेल्या १३६ टँकरची नोंद परिवहन विभागाकडे आहे. यामुळे शहरातील रस्त्यावर अनधिकृतरित्या टँकर माफिया सरसावला असल्याचे दिसून येऊ लागले आहे.

अशा टँकरवर वाहतूक पोलिसांनी कारवाई करावी. तसेच वाहतूक परिवहन विभागाने मुदतकाळ संपलेले टँकर जप्त करावेत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

केईएम रुग्णालयात धक्कादायक घटना

महिला कर्मचाऱ्याच्या भावाने डॉक्टरवर केला जीवघेणा हल्ला

मुंबई,

मुंबईतील परळ येथील केईएम रुग्णालयात एक धक्कादायक घटना घडली आहे. या रुग्णालयातील एका महिला कर्मचाऱ्याच्या भावाने रुग्णालयातीलच डॉक्टरवर चाकूने जीवघेणा हल्ला केला. या घटनेमुळे रुग्णालयातील कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वैद्यकीय संस्थांतील सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, ही घटना रुग्णालयाच्या आवारातच घडली असून हल्ल्यात संबंधित डॉक्टर गंभीर



जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सध्या त्याच रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राथमिक तपासात हा प्रकार वैयक्तिक वादातून घडल्याचे उघड झाले आहे.

बहिणीसोबतच्या संबंधातून नाराजी पोलिसांच्या प्राथमिक चौकशीतून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हा ड्एट रुग्णालयातील एका महिला कर्मचाऱ्याचा भाऊ आहे. आपल्या बहिणीचे डॉक्टरसोबत असलेले संबंध पाहून तो नाराज होता. रागाच्या भरात त्याने आपल्या दोन साथीदारांच्या मदतीने डॉक्टरवर चाकूने हल्ला केला आणि तिघेही घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी खुनाचा प्रयत्न म्हणून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी आणि त्याच्या साथीदारांच्या शोधासाठी तपास मोहीम सुरू केली आहे.

या घटनेमुळे वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली असून, मुंबईतील डॉक्टरांनी सर्व रुग्णालयांमध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी अधिक कडक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

केलेल्या कामामध्ये बेजबाबदारपणा महानगरपालिकेच्या संबंधित अभियंता व शिपाई यांना तत्काळ नोटीसा बजावण्यात आल्या



■वसई। प्रतिनिधी,

एमबीएमसीच्या मुख्यालयात दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी मा. आयुक्तांच्या दालना जवळील सभागृहात सर्व पक्षीयांनी फ्टउ बाबत घेतलेल्या बैठकीत माजी महापौर मा. श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांना पिण्यासाठी देण्यात आलेले पाणी दूषित असल्याचे निदर्शनास आले. याबाबत त्यांनी प्रसार माध्यमातून तक्रार केली होती. या घटनेची गंभीर दखल मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी त्वरित घेतली असून तात्काळ संबंधित शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता व शिपाई यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. सदर नोटिसींच्या अनुषंगाने प्राप्त होणा-या खुलाशावर नियमोचित कार्यवाही करणेबाबत मा. आयुक्त यांनी निर्देशित केले आहे.

तथापि आपल्या मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व एमआयडीसी ह्या प्राधिकरणाकडून पाणीपुरवठा होत आहे. सदरचा पाणीपुरवठा हा संबधित प्राधिकरणाकडून शुद्धीकरणाची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करूनच मिरा भाईंदर शहराला शुद्ध पाणीपुरवठा होत असतो. सदरचा पाणीपुरवठा शहरांमध्ये होत असताना त्यामध्ये टप्प्याटप्प्याने क्लोरीनेशन केले जाते. तसेच शहरांमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या जलकुंभामध्ये सुद्धा ॲडिशनल क्लोरीनेशन केले जाते. त्याचप्रमाणे फाटक मुख्य कंट्रोल व सर्व जलकुंभावर क्लोरीनेशन करून त्यांची वेळोवेळी तपासणी केली जाते. अशा प्रकारे शहरांमध्ये कायमच शुद्ध पाणीपुरवठा होत असतो. मिरा भाईंदर महानगरपालिका शहरात आणि कार्यालयात सुद्धा शुद्ध पाणी पुरवठा करण्यास कटिबद्ध आहे.

संभाजीनगर-पुणे प्रवास वेळ वाचणार!

औट्रम घाटातील बोगद्याला केंद्राची मंजुरी... २ कोटींचा प्रकल्प



बोगद्याची रचना

डबल ट्यूब स्ट्रक्चर, अत्याधुनिक वायुवीजन, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग अशी बोगद्याची रचना असून फायर सिस्टिम, डिजिटल सेन्सर, सीसीटीव्ही, वाहन नियंत्रण केंद्र अशी सुरक्षा सुविधा राहणार आहे. बोगद्यात वाहन वेग ताशी १०० किलोमीटरपर्यंत राहू शकेल.

जळगाव,

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील औट्रम घाट हा अवघड आणि धोकादायक घाट म्हणून ओळखला जातो. अनेक वर्षांपासून या घाटावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना अपघात, वाहतूककोंडी आणि विलंबाचा सामना करावा लागत होता. आता या घाटावरून प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ करण्यासाठी केंद्र सरकारने ५.५० किलोमीटर लांबीच्या अत्याधुनिक बोगद्याच्या बांधकामास मंजुरी दिली आहे.

या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावर सुमारे २,४३५ कोटी खर्च होणार असून, टेलवाडी ते बोधरे दरम्यान सुमारे १५ किलोमीटरच्या टप्प्यात हा बोगदा उभारला जाणार आहे. या बोगद्यामुळे संभाजीनगर-पुणे दरम्यानचा प्रवास वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल. तसेच अपघातांचे प्रमाण घटेल. हा प्रकल्प महाराष्ट्राच्या विकास प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे.

औट्रम घाटात अनेक अपघात झाले, वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. घाटाऐवजी सुरक्षित बोगदा उभारावा ही जनतेची मागणी होती. त्या अनुषंगाने वारंवार केंद्रीय पातळीवर वेगवेगळ्या स्तरावर पाठपुरावा केला गेला. अखेर केंद्र सरकारने या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. हा निर्णय महाराष्ट्राच्या विकास प्रवासातील ऐतिहासिक टप्पा ठरेल. या प्रकल्पामुळे इंधन बचत, वेळेची बचत आणि अपघातांमध्ये घट होईल.

या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड, माजी खासदार उन्मेष पाटील आणि आमदार मंगेश चव्हाण यांनी केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहेत.



शैक्षणिक पुराव्यांची कसून पडताळणी होणार!

शाळा सोडल्याचे दाखले/उतारे संबंधित शाळेतील मूळ जनरल रजिस्टरशी तपासावे लागणार आहेत. रजिस्टरमध्ये फेरफार, वेगळ्या शाईची नोंद किंवा खाडाखोड आढळल्यास सविस्तर अभिप्राय आवश्यक आहे. महसुली अभिलेखांमध्ये (उदा. ७/१२, फेरफार पत्रक, कोतवाल पंजी, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र) बदल, विसंगती किंवा बनावटीकरण आढळल्यास त्याबाबतची कागदपत्रे आणि अभिप्राय सादर करावे लागतील.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेत मोठे पाऊल

सहा आठवड्यांत चौकशी पूर्ण करत अहवाल सादर करणे बंधनकारक

मुंबई,

उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्रलंबित प्रकरणांच्या जलद निपटारासाठी राज्य शासनाने अनुसूचित जमाती (एसटी) प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेत मोठे पाऊल उचलले आहे. आदिवासी विकास विभागाने अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या अंतर्गत असलेल्या दक्षता पथकांसाठी एक सविस्तर 'मानक कार्यप्रणाली' (एसओपी) तातडीने लागू केली आहे. यात सहा आठवड्यांत चौकशी पूर्ण करत अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच महिना २५ प्रकरणांची चौकशी करणे अशा प्रकारची नियमावली जारी केली आहे. या निर्णयामुळे प्रमाणपत्रांच्या पडताळणी चौकशीत सुसूत्रता येणार आहे. याबाबत नुकताच शासन निर्णय जारी केला. 'नागेश्वर देविदास धाडे विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर' यासह इतर याचिकांमध्ये उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या निदेर्शानुसार, राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची बैठक पार पडली. दक्षता पथकांना प्राप्त झालेल्या प्रकरणांत ६ आठवड्यांच्या आत चौकशी पूर्ण करून अहवाल समितीस सादर करणे बंधनकारक असेल. प्रत्येक पोलीस निरीक्षकाने दरमहा किमान २५ प्रकरणांची चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. पोलीस निरीक्षक/शिपाई गैर अर्जदारास फायदा व्हावा या उद्देशाने चुकीचा चौकशी अहवाल सादर करत असल्यास, त्यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित केली जाईल आणि ते भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार कार्यवाहीस पात्र ठरेल. दक्षता पथकाचे काम अधिक प्रभावी आणि वेळेवर पूर्ण झाल्यास वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा लवकर होण्यास मदत होईल.



कल्याण-मुरबाड मार्गाची स्थिती अत्यंत वाईट

कल्याण-मुरबाड मागार्ची स्थिती शहाड उड्डाणपुलापेक्षा वाईट आहे. म्हारळपासून मुरबाडपर्यंतचा रस्ता गेली अनेक वर्षे कामाच्या प्रतीक्षेत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त झाले असून, प्रवास धोकादायक बनला आहे. त्यामुळे नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

दुरुस्तीनंतरही शहाड उड्डाणपूल खड्डेमय

जीव मुठीत धरून करावा लागतोय प्रवास

उल्हासनगर,

कल्याण-नगर महामार्गावरील शहाड उड्डाणपुलाची अवस्था आता 'महामार्ग' नव्हे तर 'खड्डामार्ग' म्हणून होऊ लागली आहे. पंधरा दिवस वाहतूक बंद ठेवून राष्ट्रीय महामार्ग विभागाने पुलाच्या दुरुस्तीचे आश्वासन दिले होते. मात्र पुलावर डांबर नाही, खड्ड्यांचे साम्राज्य अशी अवस्था सध्या आहे. त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे नागरिक, प्रवासी आणि वाहतूकदार वर्ग संतप्त झाला आहे. अनेक वर्षांपासून शहाडचा उड्डाणपूल प्रशासनाच्या दुर्लक्षाचा बळी ठरला आहे. दर काही महिन्यांनी या मार्गावरील डांबर उखडते, खड्डे वाढतात. शहरातील विविध राजकीय पक्ष, स्थानिक नागरिकांनी आणि विविध सामाजिक संघटनांनी वेळोवेळी आंदोलन करून लक्ष वेधले. अखेर सप्टेंबरच्या अखेरीस राष्ट्रीय महामार्ग विभागाने २८ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या काळात पूल वाहतुकीसाठी बंद ठेवला आणि दुरुस्तीचे काम सुरू केले. पण २६ ऑक्टोबरपर्यंतही रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली तसाच 'अर्धवट आणि असुरक्षित' अवस्थेत दिसत आहे. पुलावरील रस्त्याचे पृष्ठभाग एवढे उखडले आहेत की वाहनचालकांना वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे. काही ठिकाणी उंच-सखल खाचखळगे पडल्याने अपघाताचा धोका कायम आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांनी नाराजी व्यक्त केली आहे. हा पूल तातडीने दुरुस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

येवल्याजवळ ३ साई भक्तांवर काळाचा घाला

'फॉर्च्यूनर' गाडीचा भीषण अपघात... ४ जण जखमी

नाशिक,



सुरतहून शिर्डीकडे निघालेल्या साई भक्तांवर काळाने घाला घातला आहे. येवला तालुक्यातील एरंडगाव-रायते शिवारात चालकाचे नियंत्रण सुटल्याने फॉर्च्यूनर गाडीचा भीषण अपघात झाला. यामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला, तर चार जण जखमी झाले आहेत. अपघाताची भीषणता एवढी होती की गाडीने तीन पलट्या घेतल्या. सर्व मृत सुरत येथील असल्याची माहिती आहे. प्राप्त माहितीनुसार, मंगळवारी रात्री उशिरा हा अपघात झाला. सुरत येथून सात साईभक्त शिर्डीला येण्यासाठी फॉर्च्यूनर गाडीत निघाले होते. प्रवासादरम्यान येवला तालुक्यातील एरंडगाव-रायते शिवारात चालकाचे नियंत्रण सुटले. गाडीने तब्बल तीन पलट्या खाल्ल्या. या अपघातात तीन साईभक्तांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले. जखमींना नाशिकच्या शासकीय रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. अपघाताची येवला तालुका पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

किरकोळ वाद टोकाला पोहोचला, १७ वर्षीय मुलाने मैत्रिणीलाच पेटवले अन् काही क्षणात

ठाणे,

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील गुन्हेगारीत वाढ होत आहे. त्यातच आता ठाण्यात मैत्रीतील वादातून एका १७ वर्षीय मुलाने आपल्याच मैत्रिणीला पेटवून दिल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. ठाण्यातील कापूरबावडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. या दुर्घटनेत पीडित मुलगी सुमारे ८० टक्के भाजली असून, तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुलीच्या आईच्या तक्रारीनंतर कापूरबावडी पोलिसांनी १७ वर्षीय आरोपी मुलाला ताब्यात घेतले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे.

नेमकं प्रकरण काय?

या घटनेतील पीडित १७ वर्षीय मुलगी तिच्या कुटुंबियांसह ठाण्यातील कापूरबावडी



परिसरात राहते. मात्र यापूर्वी ती कुटुंबासोबत मुंबईतील चेंबूर भागात वास्तव्यास होती. त्याचवेळी तिची ओळख चेंबूरमध्ये राहणाऱ्या एका मुलाशी झाली. काही दिवसांपूर्वी मुलगी भाऊबीजेच्या निमित्ताने ती मुलगी पुन्हा चेंबूर येथे गेली होती. त्यावेळी आरोपी मुलाने तिच्यासोबत वाद घातला. तिला मारहाण केली. मुलीच्या नातेवाईकांना ही माहिती मिळताच, ते तिला सोडवण्यासाठी गेले. त्यांनी मुलाला पकडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी संतापलेल्या मुलाने मुलीला मी तुला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली होती. या धमकीमुळे मुलगी प्रचंड घाबरली होती.

यानंतर २४ ऑक्टोबर रोजी पीडित मुलगी ठाण्यातील तिच्या घरामध्ये एकटी असताना अचानक घरातून धूर निघू लागला. परिसरातील नागरिकांनी तात्काळ मुलीच्या आईला याची माहिती दिली. कुटुंबीय धावत घरी आले असता त्यांना तो मुलगा घरात दिसला, तर मुलगी भाजलेल्या अवस्थेत वेदनेने ओरडत होती. तिला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. कुटुंबियांनी आरोपी मुलाला जाब विचारला असता, तो तेथून पळून गेला.

तरुणानं पोलिसांची स्कूटर धावत पळत रोखली, भररस्त्यात जुंपली

ठाणे,

ठाणे पश्चिमेला राहणाऱ्या एका विद्यार्थ्यानं वाहतूक पोलीस दलातील दोन अधिकाऱ्यांच्या दुचाकीचा पाठलाग करत त्यांना रोखलं. वाहतूक नियमांचं उल्लंघन केल्यावर आमच्याकडून दंड घेता. मग तुम्ही अस्पष्ट नंबरप्लेट असलेली दुचाकी कशी काय वापरता, असा सवाल तरुणानं पोलिसांना विचारला. त्यावेळी तरुणाचा मित्रदेखील त्याच्या सोबत होता. पोलीस आणि तरुणांनी एकमेकांशी हुज्जत घातली. त्याचा व्हिडीओ आता समोर आला आहे. सोशल मीडियावर हा व्हिडीओ बराच व्हायरल झाला आहे.

एक्सवर व्हायरल झालेल्या व्हिडीओत एक तरुण पोलिसांची स्कूटर धावत जाऊन अडवताना दिसत आहे. त्याचा मित्र मागून येत हा प्रकार रेकॉर्ड करत आहे. दुचाकीवर मागे बसलेल्या वाहतूक पोलिसानं हेल्मेट परिधान केलेलं नाही. दुचाकीवर येणारा तरुण ओ साहेब थांबा, कशाला पळताय, असं ओरडतो. त्यावेळी त्याचा मित्र पोलिसांच्या दुचाकीला मागून खेचतो. त्यानंतर पोलीस दुचाकी थांबवतात.

यानंतर तरुण आणि पोलिसांमध्ये शाब्दिक बाचाबाची होते.



तुमच्या दुचाकीवरील नंबरप्लेट स्पष्ट दिसत नाही. त्यावरील नंबर नीट दिसत नाही, याकडे कॉलेजला जाणारा तरुण लक्ष वेधतो. पोलीस आम्हाला नियम पाळायला सांगतात. बाकीच्यांकडून दंड आकारतात. मग स्वतः नियम पाळतात का, असा तरुणाचा रोख होता. त्यावर ही आमची स्कूटर नाही. आम्ही ती जप्त केलेली आहे, असा प्रतिवाद पोलिसांनी केला. तरुणानं यावरूनही पोलिसांना प्रश्न केला. जप्त करण्यात आलेली स्कूटर तुम्ही कशी चालवू शकता, ही स्कूटर तुम्ही कशी वापरु शकता, असे सवाल त्यानं केले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com